# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/शै.शुल्क/२०१९/3251
दिनांक : 05 AUG 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व पदविका, व्यावसायिक
पदवी, व पदव्यत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका तसेच व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काबाबत.**

संदर्भ :- मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/५६३, दि. १९.०७.२०१९.

मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन, आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका, व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब) (क) (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या उमेदवारांना संबंधित विभागांमार्फत वेळोवेळी शिष्यवृत्ती संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (SEBC) आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यात आली आहे.

या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका संस्थांमध्ये तंत्रशिक्षण संचालनालय यांचेमार्फत आणि व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) माध्यमातून प्रवेश प्राप्त होणा-या उमेदवारांना त्यांच्या संवर्गाप्रमाणे शासनामार्फत शैक्षणिक शुल्क रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात अदा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उपरोक्त नमूद उमेदवारांनासुध्दा त्या त्या विभागामार्फत निर्गमित होणा-या शासन निर्णयातील तरतूदीनुसार शिष्यवृत्तीची रक्कम अदा होणार आहे.

तरी याबाबत सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेणा-या उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळी संबंधित शासन निर्णयानुसार देय शुल्क आकारण्यात यावे. प्रस्तुत प्रकरणी आपल्या संस्थेकडून उमेदवारांना प्रवर्गनिहाय अनुज्ञेय शिष्यवृत्ती विचारात न घेता शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास, अशा संस्थेविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

Gaikwad 5.8.19
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या सकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.